# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट :
www.srapune.gov.in

जा.क्र. झोपुप्रा/तां-१/भोप्र/मा.क्र.१८६/२१०८/२०२३ दि.०८/११/२०२३.

## अंशत: भोगवटा प्रमाणपत्र

वाचा - १) प्रथम बांधकाम परवानगी (मूळ CC) जा.क्र.१८६३/२०१६ दि.२०१६/११/१८

२) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र.३९९/२०२०, दि. ०५/०३/२०२०.

३) वास्तूविशारद यांनी केलेला अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा दि.२३/१०/२०२३ रोजीचे विनंती अर्ज.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

---

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलमे २५३/२५४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे **सि.स.नं.२००, फा.प्लॉ.क्र. ५ पै, सब प्लॉ. क्र.४, मंगळवार पेठ, पुणे येथील** झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील (पुनर्वसन घटक) इमारतीस या कार्यालयाकडून जा. क्र झोपुप्रा/तां.३/३९९/२०२०, दि. ०५/०३/२०२० अन्वये बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे संयुक्त इमारतीमधील काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील सदनिका/ गाळे इ.साठी भोगवटा पत्र मिळण्याबाबत प्रकल्पाचे वास्तूविशारद यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार संयुक्त इमारतीस अंशत: भोगवटा प्रमाणपत्र खालील प्रमाणे देणेत येत आहे.

पुनर्वसन + विक्री घटक इमारत

| अ.क्र. | मजले | सदनिका/दुकान क्र. (पुनर्वसन घटक) | एकूण सदनिका/दुकाने |
|---|---|---|---|
| १) | ग्राउंड फ्लोअर | दुकान क्र. १ | १ दुकान + सोसायटी ऑफिस + पार्किंग |
| २) | पहिला | बालवाडी | बालवाडी + ३ सदनिका |
| ३) | दुसरा | सदनिका क्र. २०१,२०२,२०३, २०४ + वेलफेअर सेंटर | ४ सदनिका + वेलफेअर सेंटर |

08-11-2023

D:\SHUBHAM\२०० MANGALWAR PETH\COMPLITATION CERTIFICATE + TIPNI.DOCX

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | तिसरा | सदनिका क्र. ३०१,३०२, ३०३,३०४,३०५ | ५ सदनिका |
| ५) | चौथा | सदनिका क्र. ४०१,४०२,४०३,४०४,४०५ | ५ सदनिका |
| ६) | पाचवा | सदनिका क्र. ५०१,५०२,५०३,५०४,५०५ | ५ सदनिका |
| ७) | सहावा | सदनिका क्र. ६०१,६०२,६०३,६०४,६०५ | ५ सदनिका |
| ८) | सातवा | सदनिका क्र. ७०१,७०२, ७०३,७०४,७०५ | ५ सदनिका |
| ९) | आठवा | सदनिका क्र. ८०२,८०३,८०४, ८०५ | ४ सदनिका + REFUGE AREA |
| १०) | नववा | सदनिका क्र. ९०१,९०२,९०३,९०४,९०५ | ५ सदनिका |
| ११) | दहावा | सदनिका क्र. १००१,१००२, १००३,१००४, १००५ | ५ सदनिका |

Slum Rehabilitation Authority ★ Technical Department APPROVED ★ Pune-Pimpri-Chinchwad Area

i ) पुनर्वसन इमारत:- ४३ सदनिका + १ दुकानगाळे + सोसायटी ऑफिस + वेलफेअर सेंटर + बालवाडी

एकूण :- ४३ सदनिका + १ दुकानगाळे + सोसायटी ऑफिस + वेलफेअर सेंटर + बालवाडी

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

**अटी:-**

१) प्रस्तुत अंशत: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) अंशत: भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.



Scanned with CamScanner

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) दि.०७/११/२०२३ रोजी सदर योजनेस भोगवटा प्रमाणपत्र व टी.डी.आर अदा करणेस कोणतीही कायदेशीर बाधा नसल्याने या संदर्भात पुढील कार्यवाही करणे हरकत नाही, असे अभिप्राय प्राप्त झाले आहेत.

५) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

६) इमारतीचे सर्व बाजुने असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) खुले ठेवणे बंधनकारक आहे.

७) योजनेसाठी अंतिम भोगवटा प्रमाणपत्र अदा करणेपूर्वी अंतिम Fire NOC कार्यालयात सादर करणे विकसकास बंधनकारक राहील.

८) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

९) विषयांकित योजना रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र असल्यास म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, अंतिम टप्प्यातील टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

१०) प्रस्तुत गृहनिर्माण प्रकल्पाकरीता सक्षम प्राधिकाऱ्याने पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहनिर्माण प्रकल्पातील सदनिका हस्तांतरण करणेपूर्वी पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे विकसकावर बंधनकारक राहील.

११) सि.स.नं.२००, फा.प्लॉ.क्र. ५ पै, सब प्लॉ. क्र.४, मंगळवार पेठ, पुणे या झोपडपट्टी योजनेतील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये सोडतपद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

08-11-2023

{ मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे
दि.०१/११/२०२३ रोजीचे मान्यतेने }

प्र.सहायक संचालक नगररचना ,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

प्रत :- १. विकसक मे. सम्यक गृहनिर्माण प्रा.लि.
स. नं. ३७, प्लॉ. नं. ३९/५, मोर्य कृपा को. ऑप हौसिंग सोसायटी, प्रतिज्ञा हॉल जवळ, समर्थ रोड, हिंगणे बुद्रुक, पुणे-४११०५२

२.वास्तुविशारद श्री राहुल माळवदकर
स.नं. ६७२/६७३ प्लॉट १०, लोकेश सोसायटी, समर्थ बिल्डिंग, बिबवेवाडी पुणे ३७.

३. तहसिलदार,ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव सादर.

४. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.



Scanned with CamScanner